ईच्छा आणि अपेक्षा मर्यादित असल्या की स्वाभिमान विकण्याची वेळ येत नाही

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २१ जुले २०२५ | अंक २१२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007

All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY

www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते


देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555

# सत्तेचा चढला माज अन मंत्र्याला नाही राहीली लाज

## जगंली रमी व आता महाराष्ट्र चे जगंली मंत्री

राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी आज मोठा बॉम्ब गोळा टाकला. पावसाळी अधिवेशनात सभागृहाचे कामकाज सुरू असताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मोबाईलवरच रमीचा डाव मांडल्याचा व्हिडिओ त्यांनी शेअर केला. त्यांच्या अधिकृत एक्स खात्यावरून त्यांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे. राज्यात शेतकरी आत्महत्या हा चिंतेचा विषय झालेला असताना कृषी मंत्र्यांच्या या बेजबाबदार वर्तनाने विरोधकच नाही तर शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. त्यावर विविध नेत्यांच्या संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी राज्याच्या राजकारणात आज मोठी खळबळ उडवून दिली. त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर त्यांनी राज्याच्या कृषीमंत्र्यांचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यांच्या पोस्टमुळे खळबळ उडाली आहे. या व्हिडिओने राज्यात संतापाची लाट उसळली आहे. सत्तेतल्या राष्ट्रवादी गटाला भाजपला विचारल्याशिवाय काहीच करता येत नाही म्हणूनच शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या करत असताना सुद्धा काही कामच नसल्याने कृषिमंत्र्यांवर रमी खेळण्याची वेळ येत असावी.**********

## असे मंत्री चालतातच कसे?

या कृषीमंत्र्याने शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्याशी केली. अनुदानाचा पैसा शेतकरी लग्न कार्यासाठी वापरत असल्याचा आरोप केला, अजून काय काय मुक्ताफळं उधळली. आणि हाच माणूस आता विधानसभेच्या सभागृहात रमी खेळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना असा माणूस चालतोच कसा? असा सवाल करत याविरोधात आवाज उठवणार असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी म्हणाले.

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक संवाद महत्वाचा – प्राचार्य भक्तराज पौळ


# उमापुर येथे माध्यमिक विद्यालयात पालक मेळावा संपन्न

गेवराई : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व विद्यार्थी संवाद खुप महत्वाचा असून त्याबाबत सर्व पालकांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक - विद्यार्थी तसेच शिक्षक संवाद तसेच पालक मेळावा महत्वाचा आहे असे प्रतिपादन प्राचार्य भक्तराज पौळ यांनी केले. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, उमापुर येथे शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष तथा युवा नेते रणवीरराजे पंडित यांच्या प्रेरणेने शनिवार दि.१९ जुलै रोजी इयत्ता दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या माता- पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य भक्तराज पौळ यांनी पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या करिअर विषयी व शिक्षण याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी नवनाथ शितोळे, रामेश्वर त्रिंबके, रावसाहेब काळे, महेश औटी, नानासाहेब वीर, दत्तात्रेय चेडे, रमेश राऊत, ज्ञानेश्वर भिसे, सुनील चव्हाण, सतीश शेळके, गणेश देशमुख, नानासाहेब पठाडे, जालिंदर धोत्रे, सुरेश जगदाळे, रामेश्वर औटी, दत्तात्रय



बांडे सचिन भोसले, रवींद्र जगदाळे, गणेश हवाले, कैलास आहेर, अनिल आहेर, भरत आहे, रवी काळे, किशोर औटी, नारायण वडगणे, भरत देशमुख, विठ्ठल कोरडे, योगेश पिंगळे, महेश औटी, योगेश औटी, विनोद राऊत, राऊत गणेश, काकासाहेब आहेर, पाराजी वीर नामदेव कुंडलिक, विलास कुंरुद, रामेश्वर भागवत, सीता शितोळे, वर्षा त्रंबके, राधा भिसे, वंदना शेळके, हिरा वडगणे जयश्री जगदाळे, कविता भोसले, राणी शितोळे, आशाबाई पवार, छाया आहेर, रेखा औटी, वंदना औटी, आश्विनी औटी, गीता औटी, मनीषा राऊत, रंजना देशमुख, योगिता राऊत, राणी शितोळे, उषा कोरडे, कविता भोसले सह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच माता - पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अज्ञात व्यक्तीने केले शेतकऱ्याचे नुकसान. पिंपळनेर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल.



बीड - पिंपळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुंदेवाडी येथील सुरुंजी गट क्रमांक 438 मध्ये काही अज्ञात इसमांनी 15 जुलै रोजी सौरऊर्जा प्लँट फोडल्याचे उघडकीस आले.मिळालेली माहिती अशी की, अशोक शेषेराव वायभट वय 37 वर्षे रा. गुंदेवाडी व्यवसाय शेती यांनी सुरुंजी गट क्रमांक 438 मध्ये सौरऊर्जेचा प्लँट बसवला होता. त्यांनी 14 जुलै रोजी विहिरीवर बसवलेले सौर ऊर्जेचे प्लँट वरील मोटारीने शेतात पाणी दिले होते. व सायंकाळी 6 वाजता मोटर बंद करून घरी गेल्यावर, दुसऱ्या दिवशी दुपारी 12 वाजता कोणी तरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या शेतातील विहिरीवर बसवलेले सौर ऊर्जेचे प्लँट फोडून नुकसान केल्याचे आढळून आले. त्यांनी पिंपळनेर पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत.

# विश्वास ठेवाल तरच यश मिळेल-लेखक -अशोक काशिद

बीड । प्रतिनिधी मधील मानस गुरुकुल येथे लेखक श्री अशोक काशीद यांचे व्याख्यान झाले. नुकतेच प्रकाशित झालेल्या मयश तुमच्या हातातफया मार्गदर्शक व प्रेरणादायी ग्रंथाविषयी सरांनी माहिती दिली.यश मिळावण्यासाठी काय करावे लागते ? याविषयी प्रदिर्घ अभ्यास करून हा ग्रंथ लिहला आहे.विद्यार्थी दशेत आपल्यापुढे निश्चित ध्येय असेल तर आपण ठरवलेले स्वप्न पूर्ण करू शकतो.यासाठी प्रत्येक व्यक्तीला आधी स्वतःच्या धारणा बदलून घ्याव्या लागतात.जे स्वप्न आपण नजरे पुढे ठेवले आहे त्यासाठी पूर्णपणे वाहून घ्यावे लागते. प्रसंगी त्यागही करावा लागतो . आपला स्वतःच्या विचारांवर विश्वास असला की आपल्याला पुढचा मार्ग दिसू लागतो. कोणताही प्रयत्न हा शेवटचा नसून जोपर्यंत आपल्याला यश येत नाही, तोपर्यंत आपण प्रयत्न करणे अपेक्षित आहे. एडिसन ने हजारो प्रयोग केल्यावर त्याला बल्बचा शोध लावता आला . यासारखी अनेक उदाहरणे देऊन सरांनी विदयार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनाही त्यांच्या जीवनात यश खेचून आणायचे असेल तर या पुस्तकाचा मोलाचा फायदा होऊ शकतो.याप्रसंगी यशाची प्रक्रिया सरांनी समजावून दिली.यशाच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडथळ्यावर कशी मात करता येईल याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानस गुरुकुल चे प्रमुख श्री जाधव सर होते.विद्यार्थ्यांना वाचनासाठी यश तुमच्या हातात हा ग्रंथ भेट देण्यात आला . विद्यार्थ्यांनीही व्याख्यानाला उत्तम प्रतिसाद दिला. उत्साहात कार्यक्रमाची सांगता झाली.

# रा.काँ.चे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांचा डॉ.योगेश क्षीरसागरांकडून सत्कार

## बीडमधील संपर्क कार्यालयास भेट; आ.धनंजय मुंडे, रुपाली चाकणकरांसह नेत्यांची उपस्थिती





बीड (प्रतिनिधी) दि.२० : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी रविवारी (दि.२०) बीड शहरातील डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या भेटीनिमित्त डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते खा.तटकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार विक्रम काळे, आनंद परांजपे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, लतिफ तांबोळी, जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, महिला आघाडीच्या अ‍ॅड. प्रज्ञा खोसरे, रमेश आडसकर, युवा नेते बळीराम गवते, अविनाश नाईकवाडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे आजी-माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भेटीदरम्यान आगामी संघटनात्मक कामकाज, पक्ष विस्तार, तसेच स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

# अभय योजनेचा लाभ घेऊन थकीत मालमत्ता करावरील दंडात सुट मिळवा–जयश्री विधाते

बीड । प्रतिनिधी काही कारणास्तव मालमत्ता धारकांने नगर पालीकेला वेळेवर मालमत्ता कर भरला नसल्यास त्या थकीत रक्कमेवर नगर पालीका दंड आकारत असते. तेंव्हा थकीत मालमत्ता करावरील दंडाच्या रक्कमेत ५०% किंवा त्या पेक्षा जास्त सुट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५० नुसार (१) (अ) नुसार बिलाच्या न भरलेल्या रक्कमेवर विशिष्ट % दरमहा दंड आकारला जातो.यामुळे कर भरणा रक्कमेत वाढ होते. परिणामी करवसुली चा दर मंदावतो . तेंव्हा कर भरण्यासाठी मालमत्ताधारकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाने अभय योजना (थकीत मालमत्ता करावरील दंडाच्या रक्कमेत ५०% किंवा जास्त सुट देण्याचा निर्णय) लागु केली असुन दि. १९-५-०२५ पुर्वीच्या थकीत कराच्या दंडातच सुट दिली जाईल. यासाठी नगर पालिकेत विहीत नमुन्यात अर्ज दाखल करावा लागेल तो अर्ज तुम्हाला नगर पालीकेतुन उपलब्ध करून दिला जाईल. अर्जा सोबतच मालमत्ता कराच्या मागणीच्या बिलाची छायांकित प्रत, आधार कार्डची छायांकित प्रत, संपुर्ण कर कराची रक्कम भरल्याच्या पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि ८-८-०२५ पर्यंत अर्ज दाखल करावा

# राष्ट्रवादीच्या मेळाव्यांतून बळीराम गवतेंच्या पंखात भरले बळ

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तटकरे यांच्याकडून बळीराम गवतेंवर युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी, ना.अजित पवारांनीही केले होते कौतूक



बीड: राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी मागील काही महिन्यांपुर्वी 'युवा संवाद' कार्यक्रमातून बळीराम गवते यांच्या जनसंपर्काचे जाहिर कौतूक केले होते तर प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बळीराम गवते यांच्या कामाची दखल घेत दि.२० जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करून एकप्रकारे राजकिय बळच त्यांच्या पंखात भरले आहे. बळीराम गवते हे ग्रामीण भागातून पुढे आलेले युवा नेतृत्व असून त्यांनी बीड पंचायत समितीच्या माध्यमातून मतदारसंघात स्वत:ची ओळख निर्माण केली आहे.पंचायत समितीच्या माध्यमातून सामान्य नागरिकांचे कामे करताना त्यांनी जनसंपर्क वाढविला. याच कामाचे मुल्यमापन पक्षाकडून होत असून राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बळीराम गवते यांनी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सकाळी ९ वाजता युवा संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यास अफाट गर्दी पाहून अजित पवार यांनी सलग तासभर युवकांशी संवाद साधला होता. यावेळी बळीराम गवतेंच्या जनसंपर्काबाबत आणि तरूणांना सोबत घेवून चालण्याच्या पध्दतीबद्दल कौतूक केले होते. याच कार्यक्रमामुळे त्यांच्यावर मोठी जबाबदारी येऊ शकते, अशी चर्चा सुरू झाली होती. यानंतर दि.२० जुलै रोजी पुन्हा याच ठिकाणी 'निर्धार नवपर्वाचा, पदाधिकारी सवांद मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, पक्षाचे नेते आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, महिला आघाडीच्या नेत्या रूपालीताई चाकणकर, जिल्हाधक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार आजबे काका, माजी आमदार संजय दौंड, रमेशराव आडसकर साहेब,जयसिंग भैय्या सोळंके, योगेश भैय्या क्षीरसागर, राजकिशोर मोदी, अरुण भाई इनामदार, महेश अण्णा दाभाडे, प्रज्ञाताई खोसरे. यांच्या उपस्थितीत गवतेंवर युवक जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यत आली. यामुळे बळीराम गवते यांच्या पंखात पक्षाकडून बळ भरले जात आहे.

### मतदारसंघात जल्लोष, वाटले पेढे, फोडले फटाके

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकर यांनी निर्धार नवपर्वाचा, पदाधिकारी संवाद मेळाव्यात बळीराम गवते यांची युवक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केल्यानंतर अवघ्या काहीच वेळात मतदारसंघात आणि जिल्हाभरात कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. शहरातील माने कॉप्लेक्स या भागात दिवाळीच साजरी करण्यात आली. ग्रामीण भागात पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केल्याचे दिसून आले.

### बळीराजा निवासस्थानी खा.तटकरेंची भेट

निर्धार नवपर्वाचा पदाधिकारी संवाद मेळाव्याच्या पुर्वसंध्येला प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी बळीराम गवते यांच्या 'बळीराजा' निवासस्थानी भेट दिली. यावेळी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, आ.धनंजय मुंडे, जेष्ठ नेते अमरसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, आ.विक्रम काळे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, जिल्हाधक्ष राजेश्वर चव्हाण यांची उपस्थिती होती. या भेटीने मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २१ जुले २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## ट्रम्प यांच्या हुकुमशाही विरोधात जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम सहा महिने झाले. या सहा महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने सहा महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. नुकतेच स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली. आंदोलकांनी या आंदोलनाला गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनात लाखो नागरिक रस्त्यावर जमले. सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला. हे आंदोलन शांततेत पार पडले तरी या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला. पब्लिक सिटिझन ग्रुपच्या सह - अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध हे आंदोलन आहे. अर्थात ट्रम्प यांच्या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध अमेरिकन नागरिकांनी केलेले हे पहिलेच आंदोलन नाही. मागील महिन्यातच अमेरिकन नागरिकांनी असेच एक मोठे आंदोलन केले होते. आंदोलकांनी त्या आंदोलनाला महॅण्डस ऑफफ आंदोलन असे नाव दिले होते. ते आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले गेले. त्या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला होता त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील ते आंदोलनही शांततेत पार पडल्याने कोणालाही अटक करण्यात आली नव्हती मात्र त्या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली होती. आताही तेच झाले. सह महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर

# 25 जुलै जन्म दिवस आणि 29 जुलै महान गायक, संगीतकार स्वर्गीय सुधीर फडके यांचा स्मृतिदिन.



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. पाच भावंडापैकी एक असलेल्या सुधीर फडके यांना गाण्याचे अतिशय वेड होते. साधारण ते तीन चार वर्षांचे असताना कुणी भिकारी, बैरागी जर गाणे गात असेल तेव्हा अगदी जसेच्या तसे हुबेहूब त्याच आवाजात ते गाणे म्हणत असत. त्याचा स्वर ही चांगला होता.सुधीर फडके अर्थात बाबूजी यांचा जन्म कोल्हापूर येथे २५ जुलै १९१९ मध्ये झाला.सुधीर फडके तिसरीत असताना त्यांची आई क्षयरोगानी वारली.त्यावेळी त्यांचे वय नव वर्षाचे होते.आई वारल्यानंतर घरची परिस्थिति फारच हालाखीची झाली.त्यांच्या वडिलांची वकीली चालेनाशी झाली. घरात उत्पन्न कमी येऊ लागले.घरातील वस्तू हळूहळू गहाण म्हणून बाजारात जाऊ लागल्या.अशा वेळी सुधीर फडके हे त्यांच्या मामाच्या गावी दिवाळीच्या सुट्टीत जमखंडीला गेले होते, त्यावेळी मुंबई मधील प्रख्यात डॉ.भाजेकरांसमोर गाणे गात असताना त्यांनी त्यांचे कौतुक केले.व त्यांना मुंबई ला येण्याचा सल्ला दिला.बाबुराव गोखल्यांच्या महाराष्ट्र संगीत विद्यालया मध्ये त्यांना गाणे शिकण्यासाठी पाठविले.कोणत्याही यशाने गर्विष्ठ होणे,मगरुर होणे व अपयशाने खचून न जाणे ,हे त्यांच्या स्वभावात नव्हते.पडत्या काळात त्यांनी खूप हाल अपेष्टा सहन केल्या.संकटावर मात करीत राहिले.सुधीर फडके यांना प्रचंड मान सन्मान धन दौलत मिळून त्यांचे पाय मात्र जमिनीवर होते.सुधीर फडके यांचे खरे नाव रामचंद्र फडके असे होते पण कवी व संवाद लेखक न.ना. देशपांडे यांनी ना.सि.फडके यांच्या नव्या कांदबरी तील नायकाचे सुधीर हे नाव फारच आवडले त्यांनी एका कार्यक्रमात रामचंद्र ऐवजी सुधीर फडके हे नामकरण केले,त्यास सर्वांनी जोरदार टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला.

" चांदा ची किरणे विरली,
प्रीतीच्या माझ्या राजा ,
वाट किती पाहू रे ,
वाट किती पाहू रे."
छुम ,छुम,छुम,छुम,नाच मोरा"

" आकाशी झेप घे रे पाखरा सोडी सोन्याचा पिंजरा..." " उध्दवा अजब तुझे सरकार..," "एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे " ," जग हे बंदी शाळा, " " संथ वाहते कृष्णामाई" " दाम करी काम येड्या.." ,"कशी नशीबाने थट्टा आज मांडली " " खेळ मांडून भांडून मोडू नको," " सखी मंद झाल्या तारका," " आज राणी पूर्वीची ती प्रीत तू मागू नको.."," देहाची तिजोरी...," " पोटा पुरता पसा पाहिजे नको पिकाया पोळी," अशी सदैव जनात, मनात आठवणीत राहणारी गाणी सुधीर फडके यांनी गायली व अजरामर केली,जीवनाची वास्तवता मांडणारी, तुमच्या आमच्या अनुभवातील गाणी सुधीर फडके यांनी गायली. संगीतबध्द ही केली, गीत रामायण आणि वीर सावरकर ही त्यांची स्वप्ने होती, सुधीर फडके यांचा आवाज स्पष्ट,गोड,हळवा, मृदू , कारुण्य मय , मखमली आवाज होता.सुधीर फडके यांचा आवाज म्हणजे दैवी लिलाच म्हणावे लागेल.२९ जुलै २००२ मध्ये सुधीर फडके यांचे निधन झाले, त्यानिमित्ताने आदरांजली. " एक वार पंखा वरुन फिरो तुझा हात, शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात..."

# टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेसाठी नोंदणी करावी-आ.विजयसिंह पंडित

गेवराई-प्रतिनिधी टिपरे आणि सोंग या लोककलेचे गेवराई शहराशी अतुट नाते आहे, या लोककलेची परंपरा जोपासण्याचे काम जाणीवपूर्वक आ.विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून सुरु आहे. यावर्षीच्या टिपरे महोत्सवाचे आयोजन बुधवार, दि.३० जुलै रोजी होणार आहे. टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेसाठी संघ आणि वैयक्तिक कलाकारांनी आपली नोंदणी करण्याचे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले आहे. महोत्सवाच्या पुर्व तयारीसाठी परिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड.सुभाष निकम यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक संपन्न झाली. यामध्ये स्पर्धेची नियमावली, पारितोषिक यांसह इतर बाबींवर चर्चा झाली. सालाबादा प्रमाणे याहीवर्षी शारदा प्रतिष्ठान, गेवराई यांच्यावतीने गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून बुधवार, दि.३० जुलै रोजी सायं. ६ वाजता बाजारतळ, गेवराई येथे भव्य टिपरे महोत्सवाचे आयोजन गेवराई शहरात करण्यात येणार आहे. लोककलेचा आगळावेगळा दुर्मिळ ठेवा जतन करून संस्कृती संवर्धन करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. लोककलेला राजाश्रय देऊन ही परंपरा नव्या पिढीमध्ये रुजावी म्हणून भरघोस बक्षिसांचा वर्षाव यासाठी केला जातो. टिपरे महोत्सवाच्या आयोजना संदर्भात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकशाहीरांना अभिवादन केल्यानंतर गढी येथे झालेल्या दुर्दैवी अपघतातील मृत तरुणांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. ज्येष्ठ कलावंत ॲड.सुभाष निकम यांचा सत्कारही या बैठकीत करण्यात आला. बैठकीला शाहीर विलास सोनवणे, ज्येष्ठ कलावंत प्रशांत रुईकर, विष्णूपंत खेत्रे, संघ प्रतिनिधी महेश मोटे, दत्ता दाभाडे, अक्षय पवार यांच्यासह आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते. नागपंचमीच्या निमित्ताने टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत या कला अविष्कारांचे स्पर्धात्मक स्वरुपात आयोजन केले जाते. टिपरे महोत्सवात प्रत्यक्ष टिपरे आणि सोंग याचे सादरीकरण होते तर भोलोबा गीत स्पर्धेसाठी व्हिडीओ चित्रीकरण करून त्या माध्यमातून त्याचे परिक्षण करण्यात येते. यावर्षी नागमंत्री थाळा वादन या कला अविष्काराचा समावेश महोत्सवात करण्यात आला असून ही कला जोपासणाऱ्या मान्यवर कलावंतांचा सत्कार शारदा प्रतिष्ठानकडून केला जाणार आहे. या महोत्सवात प्रथम संघास रु.३३,३३३, द्वितीय संघास रु.२२,२२२ व तृतीय संघास रु.११,१११ रोख व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.५,५५५ यासह सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. उत्कृष्ट पात्र सजावट (टिपरे) यासाठी प्रथम ५,०००, द्वितीय ३,०००, तृतीय २,००० व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.१,००० यासह अशी वैयक्तिक पारितोषिके दिली जाणार आहेत. याशिवाय पंचमीनिमित्ताने सोंग घेण्याची परंपरा असल्याने उत्कृष्ट सोंग घेणाऱ्या कलावंतांना प्रथम ५,०००, द्वितीय ३,०००, तृतीय २,००० व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.१,५०० यासह तर उत्कृष्ट वाद्य वादकास प्रथम ३,०००, द्वितीय २,०००, तृतीय १,५०० रोख व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.१,००० यासह पारितोषिक व सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. यावर्षी लक्षवेधी कला सादरीकरण करणाऱ्या सहा कलावंतांचा रोख रक्कमेसह सन्मानचिन्ह देवून गौरव होणार आहे. त्याचबरोबर भोलोबा (फेर) गीत स्पर्धेसाठी प्रथम रु.५,०००, द्वितीय रु.३,०००, तृतीय रु.२,००० आणि उत्तेजनार्थ प्रत्येकी रु.१,००० दोन विजेत्या संघांना सन्मानचिन्हासह देऊन गौरविण्यात येणार आहे. भरघोस बक्षिसांचे वाटप यानिमित्ताने करण्यात येणार आहे. हा महोत्सव कलेच्या व परंपरेच्या प्रोत्साहनासाठी आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शारदा प्रतिष्ठानच्यावतीने आ. विजयसिंह पंडित यांनी दिली. आ.विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून सुरु झालेल्या टिपरे महोत्सवामुळे गेवराई शहरातील कलावंतांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील गल्लोगल्ली टिपरे संघ सराव करताना दिसत आहे. टिपरे महोत्सवासाठी प्रा.बाबु वादे ७५८८६३५११२, किशोर सोनवणे ९४२३३५२४०१ आणि ओम मोटे ९४२०८७४५७८ या क्रमांकावर नोंदणी करण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

# आधार केंद्र वाढवावीत सामाजिक कार्यकर्तें गणेश हिरवे यांची मागणी

आधार केंद्रावर कधीही गेले तरी खूप गर्दी असल्याचे निदर्शनास येते.सध्या अनेक पोस्ट ऑफिस आणि काही खासगी लोकांना आधार केंद्र चालविण्यास परवानगी दिली आहे.पोस्ट ऑफिस मध्ये पोस्टच्या इतर कामाबरोबरच आधार काढण्याची तोबा गर्दी असते तर खासगी केंद्र आठवड्यातून दोन तीन दिवस कोणतीही पूर्वसूचना न देता बंदच असते.आधार आता सर्वत्र म्हणजेच कोणत्याही कामासाठी लागणारा सरकारी कागद म्हणून सर्वांनाच हवा असते. लहान मुलांपासून ते वृद्ध लोकांपर्यंत सर्वच आधार साठी आग्रही असतात, तर अनेकवेळा आधार अपडेट करण्यासाठी काहीजण येतात.निवडणुकीच्या वेळी देखील आधार कार्ड लागते.नवीन इलेक्शन कार्ड काढण्यासाठी आधार कार्ड भक्कम पुरावा म्हणून जोडावे लागते.आधार कार्ड काढून देणारी केंद्र प्रत्येक विभागात वाढवायला हवी किंवा प्रत्येक तहसील आणि पालिका कार्यालये, काहीवेळा वॉर्ड स्तरावर काही शाळा कॉलेजेस मधून आधार शिबिरे स्वतः शिक्षण विभागाने किंवा शासनाने राबवायला हवी.खासगी केंद्रांना शासनाकडून प्रत्येक आधार साठी पन्नास रुपये अनुदान मिळते तरीही अनेकदा ही केंद्र बंदच असतात.केंद्र नियमित सुरू रहायला हवीत.केंद्र बंद असल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली असून याचा अधिक त्रास ज्येष्ठ, विधार्थी आणि दिव्यांग यांना होतो.सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांनी आधार केंद्रे वाढवावी अशी मागणी केली आहे.


# साप्ताहिक आम्ही मुंबईकर आयोजित सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार २०२५ हा पुरस्कार वितरण सोहळा २७जुलै रोजी जोगेश्वरी येथे जल्लोषात साजरा होणार

मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) सा.आम्ही मुंबईकर या वर्तमानपत्राचा वाचक वर्ग महाराष्ट्रात बऱ्याच प्रमाणात आहे.या साप्ताहिकातून अनेक पत्रकार बातम्या देत असतात आणि मुख्य संपादक प्रमोद सुर्यवंशी सर प्रसिद्धही करतात.याच वर्तमानपत्राच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लेखक, कवी, पत्रकार, वृत्तपत्र लेखक, चारोळीकार, लेखिका,कवियत्री, साहित्यिक अशा विविध क्षेत्रातील प्रतिभावंतांना सा.आम्ही मुंबईकर या वर्तमानपत्रातून मुख्य संपादक प्रमोद सुर्यवंशी यांनी एक लिहीत, व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन दिलेले आहे.सर्वांचे लेखन साहित्य ते प्रकाशित करतात.त्यांचे मन:पुर्वक आभार.सा.आम्ही मुंबईकर समुहातील सर्व प्रतिभावंत व्यक्तींना"सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार२०२५"जाहीर केले आहेत.या सर्व आदरणीय, सन्मानिय सदस्यांना पुरस्कार निवडपत्र ही पाठविली आहेत.कुठल्याही प्रकारचे शुल्क न आकारात हा पुरस्कार त्यांनी आयोजित केलेला आहे.मुख्य संपादक प्रमोद सुर्यवंशी,उप संपादिका सौ.वसुधा नाईक, ग्राफिक्स डिझायनर अंगद दराडे आणि सर्व टीमचे सर्व पुरस्कार्तींच्यावतीने आभार मानण्यात आले.या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पाठ्यपुस्तकातील कवी श्रीराम घडे, जेष्ठ साहित्यिक,अभिनेते अजय बिरारी, जेष्ठ साहित्यिका, समाजसेविका,सा.आम्ही मुंबईकर या वर्तमानपत्राच्या उप संपादिका सौ.वसुधा नाईक, जेष्ठ साहित्यिका सौ.वनिता कदम, प्रोडक्शन मॅनेजर आणि कास्टींग(फील्मind) सागर पतंगे आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहेत.हा पुरस्कार सोहळा रविवार दिनांक २७जुलै२०२५रोजी सकाळी११ते सायंकाळी ४या कालावधीत जुनी अस्मिता शाळा, श्रीकृष्ण नगर, कृष्ण मंदिराच्या बाजूला,वेस्टन एक्स्प्रेस हायवे, आणि पिपळेश्वर मंदिर गल्ली, बांदेकर वाडी, जोगेश्वरी(पुर्व) येथे संपन्न होणार आहे.सर्व पुरस्कार्तींचे अभिनंदन तसेच सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन सा.आम्ही मुंबईकर चे मुख्य संपादक प्रमोद सुर्यवंशी व उप संपादिका सौ.वसुधा नाईक यांनी केले आहे.







दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःशहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २१ जुले २०२५
https://lokaarambh.com



## शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांची "सांस्कृतिक व साहित्यरत्न पुरस्कार 2025" करिता झाली निवड.



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) पूर्णानगर चिंचवड पुणे येथिल जेष्ठ साहित्यिका , आदर्श शिक्षिका , शामलाक्षरी नवकाव्य निर्मात्या यांना साप्ताहिक आम्ही मुंबईकर या वृत्तपत्राकडून " सांस्कृतिक व साहित्य रत्न " पुरस्कार २०२५ करिता नुकतीच निवड झाल्याचे निवड पत्र साप्ताहिक आम्ही मुंबईकरचे संपादक प्रमोद सूर्यवंशी, उपसंपादक वसुधा नाईक, आणि ग्राफिक्स डिझाईनर अंगद दराडे यांनी शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांना निवड पत्राद्वारे कळविले आहे. रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत मुंबई येथील जुनी अस्मिता शाळा, श्री कृष्णनगर, कृष्ण मंदिराच्या बाजूला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे आणि पिंपळेश्वर मंदिर, गणपती मंदिरची गल्ली, जोगेश्वरी मेट्रो स्टेशन,मनपा ट्रामा रुग्णालय , बांदेकर वाडी, जोगेश्वरी पूर्व मुंबई ७ . या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांना त्यांच्या शैक्षणिक , सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल " सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार २०२५" देऊन गौरविण्यात येणार आहे. शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांची आतापर्यंत एकूण १६ पुस्तके प्रकाशित झाली असून या सर्वच पुस्तकांना पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. साहित्य क्षेत्रात शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांनी अतिशय उंच भरारी घेतली आहे. सातत्याने कविता, कथा, चारोळ्या व इतर साहित्य वर्तमान पत्रातून प्रसिद्ध होत असते .शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांची गाणी युट्यूबवर रसिकांच्या पसंतीला उतरली आहेत. शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांना वाचन, लेखन , प्रवास , सूत्रसंचलन , नाटिका लिहिणे आदी छंद आहेत.अनेक कवी संमेलनात त्यांनी कविता सादर केल्या आहेत. "अष्टपैलू"अष्टाक्षरी काव्यरचनांचे पुस्तकाला प्रसिद्ध संगीतकार सन्मा. अशोक पत्की सर यांची प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या साहित्याचे पूर्वी कौतुक केले आहे. *शामलाक्षरी -समान शब्द भिन्न अर्थ - काव्यरचना निर्मितीकार शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) या आहेत .शामलाक्षरी काव्य प्रकारांमध्ये पाच पुस्तके प्रकाशित झालेली आहे . साहित्यामध्ये शामलाक्षरी काव्यप्रकार रुळला आहे .

शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांच्या प्रणाली प्रकाशन , चिंचवड , पुणे अंतर्गत २०१८ पासून आजपर्यंत ४९ पुस्तक इतर कवी लेखक साहित्यिकांची प्रकाशित झालेली आहे .त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे . तसेच शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांनी सांगितले की," या पुरस्काराने माझे साहित्य क्षेत्र उजळून निघेल, लेखनास प्रोत्साहन, उर्जा मिळेल.विशेष करून मी साप्ताहिक आम्ही मुंबईकरचे संपादक प्रमोद सूर्यवंशी, उपसंपादक वसुधा नाईक आणि ग्राफिक्स डिझाईनर अंगद दराडे यांनी माझी या पुरस्कारासाठी निवड केली त्याबद्दल मनापासून त्यांचे आभार मानते." शामला रामचंद्र पंडित ( दीक्षित ) यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सांस्कृतिक व साहित्य रत्न पुरस्कार २०२५ जाहीर होताच समाजाच्या विविध थरातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम

## राज्यातील महायुतीचे ६२% मंत्री
### गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले–प्रा.सुशीला मोराले

बीड। प्रतिनिधी महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनात गेले तीन चार दिवसापासून राडा सुरू आहे. गोपीचंद पडळकर विरुद्ध जितेंद्र आव्हाड चक्क एकमेकांना मारामारी पर्यंत मजल गेली त्यापूर्वी परब आणि शंभूराज देसाई यांच्यातील हमरी तुमरी जनतेने पाहिली आई बहिणीवर शिव्या ऐकल्या, हा सगळा प्रकार सदनात पहिल्यांदाच दिसला असे मुळीच नाही जे पेरलं तेच उगवणार, विधानसभेत निवडून येण्याचा अलिखित नियम म्हणजे ज्यांच्यावर जास्त गुन्हेगारी खटले आहेत तो तिकिटाला पात्र. खरा अर्बन नक्षलवाद सभागृहात आहे काटेकोर बंदोबस्त असताना बुक्कीवाले सभागृहात जातातच कसे हा प्रश्न आहे. खऱ्या कार्यकर्त्यांना पास बंद मात्र गु डगिरी प्रवृत्तीच्या दादा लोकांना कोण सभागृहात पास देतात हे बघायला पाहिजे. राज्यात महायुतीचे फडणवीस, शिंदे व दादा पवारांचे सरकार आहे या सरकारत ६२ टक्के मंत्री गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत असे एका सर्वेक्षणात बाहेर आले आहे ४२ मंत्र्याचे मंत्रिमंडळ स्थापन झाले. मुख्यमंत्री राज्यात स्वच्छ आणि पारदर्शक कारभार करण्याची हमी देत आहेत मात्र त्यांच्याच मंत्रिमंडळातील ४२ पैकी २६ मंत्र्यांवर विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि महाराष्ट्र इलेक्शन वॉच या संस्थांनी संयुक्तपणे केलेल्या सर्वेक्षणात हे वास्तव समोर आले आहे. उमेदवारी अर्जाबरोबर दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रकात मंत्र्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचे विश्लेषण प्राप्त झाले आहे. १७ मंत्र्यावर म्हणजे ४०% मंत्र्यावर खुनाचा प्रयत्न महिलांशी संबंधित फसवणूक खंडणीसारखे गुन्हे आहेत. भाजपाच्या २० मंत्र्यांपैकी १६ म्हणजे ८०% मंत्र्यावर विविध गुन्हे दाखल आहेत. त्यात दहा मंत्र्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत तीन मंत्र्यांवर कुणाचा प्रयत्न करणे अशी नोंद आहे. शिवसेनेच्या ५०% मध्ये १२ मंत्र्यांपैकी ६ मंत्र्यांविरोधात गुन्हे नोंद आहेत पैकी तीन जणाविरुद्ध गंभीर गुन्ह्याची नोंद आहे. राष्ट्रवादीच्या १० मंत्र्यांपैकी चार मंत्र्यांवर गुन्हे दाखल असून चार मंत्र्यावर गंभीर गुन्हे दाखल आहेत

## नुसते मेळावेच काय घेता, बीडचा विकास कधी करणार ??... नितीन जायभाये
### तुमच्या मेळाव्यांच्या नौटंकी पेक्षा बीडकरांच्या मूलभूत सुविधांचे व विकासाचे प्रश्न ज्वलंत नाहीत का??.. बीड शहर बचाव मंचाचा संतप्त सवाल

बीड प्रतिनिधी : तुमच्या कार्यकर्त्यांचे रुसवे-फुगवे काढणे हेच इतके महत्त्वाचे आहे का ?.. तुम्हा सत्ताधाऱ्यांना तुमच्या कार्यकर्त्यांचे रुसवे फुगवे दिसतात पण बीड करांच्या ज्वलंत अडचणी, डोळ्यातले अश्रू का दिसत नाहीत ?.. कार्यकर्त्यांची दशा- दिशा पाहण्यासाठी येणाऱ्या सत्ताधारी नेत्यांना बीड शहराची दुर्दशा व नगरपालिकेच्या गलथान कारभाराची दिशा दिसत नाही का ?.. बीड शहराच्या विकासाची दशा व दिशा कळत नाही का ?.. बीडची जनता नानाअनंत समस्यांना रोज झुंजत आहे . प्रश्न सुटत नाहीत. सुटण्याचा काही मार्ग दिसत नाही. समस्या सोडविण्यासाठी कोणी वाली नाही. एकीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मनमानी व भ्रष्टाचाराचा कळस उभा राहिला आहे. दुसरीकडे नेते पुढारी बीड च्या स्थानिक स्वराज्य संस्थांना लोचून-लुचून खात आहेत. नेत्या पुढाऱ्यांनी, मोठमोठ्या घराण्यांच्या



राजपुत्र वारसांनी भ्रष्टाचाराचा कहर माजवला आहे. आई-बहिणीच्या अब्रूची किंमत राहिली नाही. बीड जिल्ह्यात महिलांवरील अत्याचारांना काही सीमाच उरलेली नाही. आया - बहिणींवरील अत्याचारांचे दररोज नवनवीन प्रकरणे उघडकीस येताना दिसत आहेत. कायदा- व्यवस्थेचा धाकच राहिलेला दिसत नाही. विकासाची कामे रेंगाळत चाललेली आहेत. रेंगाळलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे . अपघातांमध्ये माणसं दगावत आहेत, महिला, मुले, मुली, वृद्ध व जेष्ठ नागरिकांना अपघात ग्रस्त होऊन अक्षरशः अपंगत्व येत आहे. बीड शहरातील सर्व प्रशासकीय कारभाराचे तीन तेरा नऊ बारा वाजलेले आहेत . याला भ्रष्टाचारी अधिकारी व नेते पुढारी सर्वस्वी कारणीभूत आहेत. हे सर्व प्रश्न सोडवण्यापेक्षा सत्ताधारी नेत्यांना कार्यकर्त्यांचे रुसवे फुगवे काढणे 'हेच' महत्त्वाचे वाटते, निवडणुका आल्यामुळे पक्ष बांधणी महत्त्वाची वाटते, पण विकासाची बांधणी करताना तुम्ही नेहमीच कमी पडताना दिसता किंवा तुम्हाला लोकांच्या हाती नेहमी गाजराची पुंगीच द्यायची असते. नुसताच आश्वासनांचा बडीमार , जुमलेबाजी आणि प्रत्यक्ष विकास कामांच्या नावाने शंख हीच तुमची कार्यपद्धती झालेली आहे. पण याचे दुष्परिणाम, त्यातून निर्माण येणाऱ्या हालअपेष्टा निष्पाप आणि करदात्या जनतेला सहन कराव्या लागतात हाच आपल्या विकास कार्यक्रमांचा खरा लेखाजोखा आहे . कधी विकासावरही चर्चा करा, विकासासाठी मेळावे घ्या, भ्रष्टाचार संपवण्यासाठी ही मेळावे घ्या, असे बीड शहर बचाव मंच तुम्हाला आज आव्हान करत आहे. बीड शहराच्या नगरपालिकेची दशा आधी सुधारित करा , नेते पुढारी व अधिकाऱ्यांची मिली भगत संपवून शहराला चांगला कारभार बहाल करा, नगरपालिकेतील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करा, नेते पुढारी व अधिकाऱ्यांनी कोलमडवलेली नगरपालिकेची यंत्रणा व कारभार पारदर्शक आणि सुरळीत करून द्या असे बीड शहरातील जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंच सत्ताधारी नेत्या पुढाऱ्यांना व अधिकाऱ्यांना आव्हान करत आहे.

## आरटीओ साहेब...अठरा वर्षाखालील गाड्या चालविणाऱ्या मुला-मुलींवर कारवाई करा : शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) – बीड जिल्ह्यात अल्पवयीन मुला-मुलींनी वाहन चालवण्याचे प्रमाण चिंताजनक स्तरावर पोहोचले असून, त्याच्यामुळे अपघातांचे प्रमाणही झपाट्याने वाढत आहे. विशेषतः ट्रिपल सीट वाहनं भरधाव वेगात चालवली जात असून, यामध्ये पालकांची दुर्लक्षाची भूमिका ठळकपणे दिसून येते. समाजसेवक शेख युनूस यांनी या समस्येकडे लक्ष वेधत म्हटले की, "18 वर्षाखालील मुले व मुली वाहन चालवताना दिसत आहेत, याला जबाबदार कोण? पालकांनी यामध्ये जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तसेच, पोलिस आणि आरटीओ विभागाने अशा वाहनधारकांवर कठोर कारवाई केली पाहिजे."



शेख युनूस यांनी आणखी एका गंभीर घटनेचा उल्लेख करत सांगितले की, "परवाच्या दिवशी नवगण कॉलेज जवळ दोन युवकांनी दारूच्या नशेत भरधाव गाडी चालवून शेख अखिल या युवकास जोरदार धडक दिली. धक्का दिल्यानंतर संबंधित युवक घटनास्थळावरून फरार झाले. शेख अखिल यांना गंभीर दुखापत झाली असून, सध्या ते कृष्णा हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये दाखल आहेत. त्यांची प्रकृती अत्यवस्थ आहे." या पार्श्वभूमीवर त्यांनी बीडचे पोलीस अधीक्षक तसेच शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना विनंती केली आहे की, "तात्काळ त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संबंधित आरोपी युवकांना अटक करावी व त्यांच्यावर कठोर कारवाई करावी." शेख युनूस यांची मागणी: अल्पवयीन वाहनचालकांवर कठोर कारवाई ट्रिपल सीट आणि भरधाव वेगात गाडी चालवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई दारू पिऊन गाडी चालवणाऱ्या तरुणांवर पोलिसांनी लक्ष ठेऊन कठोर पावले उचलावीत नवगण कॉलेज परिसरातील अपघात प्रकरणी आरोपींना अटक करावी सार्वजनिक सुरक्षेसाठी यंत्रणांनी तत्काळ लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

## अवैध रिक्षा चालकांवर जिल्हा वाहतुक शाखेची मोठी कारवाई
### कारवाईत ४० रिक्षा ताब्यात; ३० हजार रुपयांचा ठोठावला दंड

बीड (प्रतिनिधी)- सध्या अवैध वाहतुक करणार्यांना बीड पोलीसांचा चांगलाच धाक बसला असून कोणत्याही वाहनचालकाने वाहतुकीचे नियम धाब्यावर बसू नयेत अन्यथा कारवाई अटळ आहे असा इशाराच जणू पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांनी व जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, पोलीस उपनिरीक्षक विजय यांनी अवैध वाहतुक करणार्यांना दिला आहे ज्याचाच भाग म्हणून काल दि.१९ जुलै २०२५ शनिवार रोजी सकाळपासून दिवसाअखेरपर्यंत ४० अवैध रिक्षा ताब्यात घेवून ३० हजार रुपयांचा रोख दंड ठोठावला आहे याम ुळे रिक्षाचालकांसह वाहतुकीचे नियम मोडणार्या सर्वांवर याचा जरब बसला आहे. बीड जिल्ह्यासह बीड शहरात दिवसभरात १० हजाराच्या वर वाहने ये-जा करत असतात त्यात रिक्षांची संख्या भली मोठी आहे असे अनेक रिक्षाचालक विनाकागदपत्रे रिक्षा चालवतात यांच्याकडे कागदपत्रे परिपुर्ण स्वरुपात आहेत की नाही याची शहानिशा करण्यासाठी जिल्हा वाहतुक शाखेचे पो.उप.नि विजय यांनी व त्यांच्या टीमने सकाळी १० वाजल्यापासून रिक्षाचालकांची कागदपत्रांची वाहतुक शाखेकडून कागदपत्रे पाहण्यास सुरुवात केली यामध्ये अनेक रिक्षाचालकांकडे लायसन्स,



इन्शुरन्स व गाडीचे कागदपत्र नव्हते त्यामुळे ४० रिक्षांवर कारवाई करण्यात आली व रोख ३० हजार रुपये दंड वसुल करण्यात आला. तरी जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांनी रिक्षा चालकांसह सर्व वाहनधारकांनी आपले वाहनाचे कागदपत्रे, इन्शुरन्स, आरसीबुक, पीयुसी, ड्रायव्हींग लायसन्स परिपुर्ण करुन जवळ ठेवण्याचे व वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. या मोहीमेत जिल्हा वाहतुक शाखेचे पो. उप.नि.विजय, सोबत पोलीस हवालदार त्रिंबक, ज्ञानेश्वर, राजाभाऊ, पोलीस अंमलदार वसीम, सिद्धार्थ, चिंतामणी, पोलीस नाईक अजिनाथ इत्यादींनी मोहीमेमध्ये सहभाग घेतला.

## च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरु
### जनतेच्या पैशांचा धुराळा; दोषींवर कारवाईसाठी रेल्वे सुरक्षा आयुक्तांची टाळाटाळ : डॉ.गणेश ढवळे

बीड :- ( दि.२० )अहिल्यानगर-बीड रेल्वेमार्गावरील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथे पावणे तीन कोटी रुपये खर्चून उभारलेला रेल्वेपुल लोहमार्ग व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असून आता तो पाडण्याचे काम जोमाने सुरू आहे. या प्रक्रियेत जनतेच्या करातून शासनाकडे जमा झालेल्या निधीचा प्रचंड अपव्यय होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणात सखोल चौकशी करून संबंधित अभियंता, ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून शासन तिजोरीत नुकसानभरपाई




जमा करावी, या मागणीसाठी दि.५ फेब्रुवारी रोजीच सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, सुदाम तांदळे, रामनाथ खोड, शिवशर्मा शेलार , शेख मुस्ताक, शेख मुबीन,अशोक येडे,रामधन जमाले यांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यावेळी रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांनी ङ्गलवकरच कारवाई होईल असे आश्वासन दिले होतेमात्र साडेपाच महिने उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने, आता पुल पाडण्याचे काम सुरू असून, सामाजिक कार्यकर्त्यांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

### खा. बजरंग सोनावणे व आ. संदीप क्षीरसागर गप्प

दि.५ फेब्रुवारी रोजी खा.बजरंग सोनावणे व आ.संदीप क्षीरसागर यांनी पालवण फाटा पुलाची प्रत्यक्ष पाहणी करून आंदोलनकर्त्यांची भेट घेतली होती. त्यांनी रेल्वे सुरक्षा आयुक्तांशी चर्चा करून कारवाईसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आजवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने, या विषयावर लोकप्रतिनिधींनी मुग गिळून गप्पच राहणे निंदनीय आहे,ङ्ख अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

## सकारात्मक, विश्लेषणात्मक पत्रकारितेवर माध्यमांनी अधिक भर द्यावा -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन
### बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून पत्रकारांसाठी कार्यशाळा कार्यशाळेस पत्रकारांची बहुसंख्येने उपस्थिती जिल्हाधिकारी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन

बीड, दि.20 (जिमाका) : समृद्ध लोकशाहीसाठी प्रसार माध्यमे, प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. नागरिक व प्रशासनात समन्वय साधण्यासाठी माध्यमे मोलाची जबाबदारी पार पाडत असतात. तरीही माध्यमांनी सकारात्मक, विश्लेषणात्मक पत्रकारितेवर अधिक भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे केले. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह येथे माहिती जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने पत्रकारांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उदघाटन जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते.

प्रमुख मार्गदर्शक दीपक रंगारी, माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे, प्रा. शिवशंकर पटवारी, प्र. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके यांची उपस्थिती होती. प्रथम मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले, शासन, जिल्हा प्रशासन नागरिकांच्या समस्या, प्रश्न सोडाविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आता जिल्हा स्तरावर होत असलेल्या जनता दरबार प्रमाणे तालुका स्तरावर देखील अधिकारी जनता दरबार घेत आहेत. जनतेचे प्रश्न, समस्या सोडवत आहेत. जनमत घडवण्याचे काम माध्यमे प्रभावीपणे करतात. त्यामुळे आजच्या नवमाध्यमाच्या युगात आणि समाज माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता सत्य माहिती जनतेला देण्याची जबाबदारी माध्यमांना पार पाडावी लागणार आहे. तसेच नागरिकांना त्यांच्या कर्तव्याप्रती जागरूक करण्याची जबाबदारीही माध्यमांनी पार पाडणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले. आजच्या या कार्यशाळेतून पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या योजना, सवलत, सोयी सुविधा यांची माहिती होण्यास उपयोग होईल, त्याचाही पत्रकारांनी लाभ घ्यावा, असेही जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्याम टरके यांनी केले. आभारही त्यांनीच मानले. कार्यशाळेबाबत प्रातिनिधिक स्वरूपात संपादक बाळासाहेब फपाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

तज्ज्ञांचे मार्गदर्शन माहिती आणि महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित पत्रकारांसाठी कार्यशाळेत तज्ज्ञांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता, प्रमाणभाषा लेखन, समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. रंगारी यांनी 'वृत्त संकलन आणि संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व' याविषयी मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेच्या शुद्धलेखनाचे नियम, शब्दांचा अर्थ, भाषेतील व्याकरणाचा वापर याबरोबरच मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली. वाक्यामध्ये येणारी क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व, दीर्घ, ईकारांत याबरोबरच एकाक्षरी क्रियापद, शब्दयोगी अव्यय, तत्सम आणि तद्भव शब्दांविषयीचे स्पष्टीकरण उदाहरणासह समजावून सांगितले. पत्रकाराने शब्दकोश आणि लेखनकोश याचा वापर करून निर्दोष लिखाण याविषयी मार्गदर्शन केले. विविध शब्दांच्या वाक्यानुसार आणि वेळेनुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले. अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या विषयांवर प्र.जिल्हा




माहिती अधिकारी डॉ.टरके यांनी माहिती दिली. समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये या विषयांवर डॉ. गोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. संक्षिप्तता, थेट आशय, छोटी वाक्ये, शब्दांचे महत्त्व, योग्य मथळा, सातत्याने समाज माध्यमावर लिहा, योग्य हॅशटॅग, थंबनेल, ग्राफिक्स, भाषा आणि टोन आदी बाबींवर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयावर प्रा. पटवारी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता पूर्वीची पत्रकारिता, भाषा, कला, शास्त्र, संस्कृती, राष्ट्रीय -प्रादेशिक वृत्तपत्रे यांची स्थिती आणि सद्यस्थितीत वापरात येत असलेली सॉफ्टवेअर, ऍप्स आदीबाबतीत सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेसाठी पत्रकारांच्या संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, शहरासह, जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यकर्त्यांच्या मारहाणीनंतर छावा प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांची पहिली प्रतिक्रिया

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत पत्ते भिरवकल्याच्या आरोपावरुन काल छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी जबर मारहाण झाली. या सगळ्या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विजयकुमार घाडगे यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या मारहाणीवर विजयकुमार घाडगे आता स्वत: बोलले आहेत. “काल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे लातूरला आले होते. राज्याच्या



कृषीमंत्र्यांनी याआधी सुद्धा शेतकऱ्यांना माजोरा शब्द वापरलेला. शेतकरी कर्ज घेऊन मुलाबाळांची लग्न थाटामाटात करतात. पुन्हा कर्जमाफी मागतात अशा प्रकारच बेताल वक्तव्य शेतकऱ्यांच्या बाबतीत कृषीमंत्र्यांनी केलं होतं” असं विजयकुमार घाडगे म्हणाले.

“परवा कहर केला. राज्याच्या विधिमंडळ सभागृहात रमी खेळतानाचा व्हिडिओ आला. आम्ही त्याचा निषेध म्हणून ज्या पक्षातून ते आले आहेत, त्या पक्षाच्या अध्यक्षांकडे आम्ही मागणी करायला गेलेलो. अशा चुकीच्या व्यक्तीला त्या पदावरु ठेऊ नका. राज्यातला शेतकरी या पदाकडे न्यायाच्या अपेक्षेने बघतो आणि असे रमी खेळणाऱ्या लोकांना त्या पदावर बसवत आहात. शेतकऱ्याला न्याय कोण देणार? ते पद इतकं महत्त्वाच आहे की, त्या ठिकाणी कायदे बनतात. त्या सभागृहाच पावित्र्य राखलं गेलं पाहिजे” असं विजयकुमार घाडगे म्हणाले सत्तेचा माज दिसला “या पदावरुन त्यांना हटवा. रमी खेळतात म्हणून आम्ही प्रतिकात्मक पत्ते दिले. त्यांना घरी पाठवा. घरी रमी खेळायला सांगा. लाखो लोकांनी तुम्हाला निवडून दिलय. शेतकऱ्यांचा कृषीमंत्री अवमान करतायत हे तटकरेसाहेबांनी ऐकून घेतलं. त्यावेळी संजय बनसोड, बाबासाहेब पाटील तिथे होते. आम्ही त्यानंतर खाली निघून आलो. लातूरचे जिल्हाध्यक्ष दीपक नरवडे तिथे होते. आम्ही तिथे बसलो होतो. पत्रकारांसोबत चर्चा सरु होती. 50-60 लोकांचा जमाव तिथे आला. आमच्या नेत्यावर पत्ते भिरकावतोस काय? असं म्हणून मारहाण सुरु केली. एवढं मारलं की, सत्तेचा माज काय असतो, ते राष्ट्रवादीच्या गुंडांकडून बघायला मिळालं” असं विजयकुमार घाडगे म्हणाले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर अश्लील भाषेत व आक्षेपार्य बोलणाऱ्या वर कारवाई करा
## माजलगाव तालुका सकल धनगर समाज बांधवांचे पोलिसांना निवेदन

माजलगाव दि.२०( प्रतिनिधी) राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विषयी आक्षेपार्य बोलणाऱ्या समाजकंटकावर पोलिसात गुन्हा नोंद करून त्याला अटक करावी अशी मागणी माजलगाव तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने माजलगाव शहर पोलीस ठाण्यात एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.पोलिसात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की धनगर समाज बांधव व बहुजन समाज बांधव यांच्यातर्फे विनंती करण्यात येते कि, दि. १८/०७/२०२५ रोजी सुनील गोपाळराव उभे या माथेफिरू इसमाने फेसबुकवरील व्हिडीओ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर अश्लील भाषेत टीका केली. यामुळे समस्त बहुजन बांधवाच्या आणि महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आणि तीव्र स्वरुपात संताप झाला, तरी सदरील इसमावर आपण कडक कारवाई करावी जेणे करून पुन्हा महाराष्ट्रातील कोणत्याही थोर महापुरुषावर कोणी अश्लील भाषा वापरणार नाही. या आरोपीवर कडक कारवाई न झाल्या धनगर समाज व बहुजन समाजाच्या वतीने राज्यभर आंदोलन करण्यात येईल. असे निवेदन माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे एपीआय प्रल्हाद मुंडे यांना देताना माजलगाव तालुका सकल धनगर समाजाचे ज्ञानेश्वर नाना सरवदे, अविनाश कांडुरे, विलास नेमाने,



दत्त नाना येवले, शंकरराव गावडे, सरपंच राज अर्जुन ,सरपंच सुखदेव मुळे ,रोहित वगरे, विशाल देवकते ,हरी गलांडे, दत्ता आबुज, शिव प्रसाद आबुज ,हनुमान गावडे ,तुषार जाधव ,सुग्रीव जावडे, केतन धापसे ,व सर्व समाज बांधव उपस्थित होते

## शहरातील स्ट्रीट लाईट, स्वच्छता आणि पाणीटंचाईचे प्रश्न तातडीने सोडवा

बीड–प्रतिनिधी शहरातील स्ट्रीट लाईट बंद पडणे, सार्वजनिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष व पुरेसा पाणीसाठा असतांना देखील पाणीटंचाई हे गंभीर प्रश्न होत चालले आहेत त्यामुळे शहरातील मुख्य अनेक ठिकाण अंधारात, गल्लीबोळात दुर्गंधी आणि नळ असतांना कोरडे अशी परिस्थिती झाली आहे तरी या प्रश्नी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नगरसेवक जगदीश गुरखुदे यांनी उपविभागीय दंडाधिकारी यांच्यासह नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सद्यस्थितीत पावसाळ्याच्या वातावरणात शहरातील अनेक रस्त्यांमध्ये पाणी साचत असून थोडा पाऊस पडला की नाल्या भरुन पाणी रस्त्यावर येते त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी होते यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच मे महिन्यात पाऊस पडल्याने पुरेसा पाणीसाठा शिल्लक असतांना देखील अनेक ठिकाणी ८–८ दिवस नळाला पाणी येत नसल्याच्या तक्रारी आहेत या सर्व प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवक जगदीश गुरखुदे यांनी दिला आहे.



गेवराई येथील तय्यबनगर येथे आयोजित केलेल्या एक दिवसीय इस्तेमा ला गेवराईचे लोकनेते बाळराजेदिर्दो पवार साहेब व गेवराई विधानसभा मतदारसंघाचे युवानेते मा.शिवराजिदार्दो पवार यांनी भेट देवुन सर्व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या,त्यावेळी इतर कार्यकर्ते आणि गेवराई विधानसभा मतदार संघातून मोट्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध – राज्यमंत्री नाईक गोर बंजारा समाजाच्या एकता मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद
### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार राज्यस्तरीय गोर बंजारा भूषण पुरस्काराचे वितरण

बीड, दिनांक १९ (जिमाका) : राज्यातील सर्व समाजाच्या सर्वांगीन विकासासाठी शासन कटीबद्ध आहे. बंजारा समाजाचे देखील विविध प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे प्रतिपादन उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.गेवराई येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त गोर बंजारा समाजाच्यावतीने आयोजित एकता मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, मुख्यमंत्री सहायता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक, महाराष्ट्र राज्य




औद्योगिक विकास महामंडळाचे सहआयुक्त विजय राठोड, साहेबराव शास्त्री महाराज, सचिन महाराज, चैतन्य महाराज, अमरसिंह पंडित, नाईक फाऊंडेशनच्या ॲडमोहिनीताई इंद्रनील नाईक, उत्तम चव्हाण, प्रा. पी.टी. चव्हाण, बाबुराव जाधव, अण्णासाहेब राठोड, राजेश पवार, सतीश पवार, अनिल राठोड आर्दींची उपसिवती होती.राज्यस्तरीय बंजारा भूषण पुरस्कार समस्त गोर समाजाच्या वतीने देऊन राज्यमंत्री नाईक यांना सन्मानित करण्यात आले. यासह राज्य लोकसेवा आयोग, दहावी, बारावी, अभियांत्रिकी आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या गुणवंतांचा राज्यमंत्री नाईक यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. अमरसिंह पंडित, उत्तम चव्हाण, पी.टी.चव्हाण, रामेश्वर नाईक, साहेबराव शास्त्री, ॲड मोहिनी नाईक यांनी विचार मांडले.सुरूवातीला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रास्ताविक उत्तम चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले. गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच गेवराई एमआयडीसीसंदर्भातील बैठक लवकरच घेण्याबाबत पुढाकार घेण्यात येईल, अशी ग्वाही उद्योग राज्यमंत्री नाईक यांनी यावेळी दिली. यासह गावतांड्यावर शासनाच्या विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

# माजलगावातील सुखसागर हॉटेलात दारु,कॉल गर्ल,पत्याचा कल्ब.? कल्ब वर पोलीसांनी धाड, नामांकित व्यक्तींचे मुलांवर गुन्हे दाखल

माजलगाव - शहरा जवळच्या राष्ट्रीय महामार्ग-६१ माजलगाव बायपास रोड वरील छत्रपती संभाजी महाराज चौकातील हॉटेल सुखसागर या आलिशान हॉटेलात रिसेप्शन, बर्थडे पार्ट्या पत्रकार परिषदा होतात सोबतच दारु,कॉल गर्ल,पत्याचा कल्ब चालतो अशी चर्चा होती याकडे दुर्लक्ष केले जात होते पण माजलगाव शहर पोलीसांनी पत्याच्या कल्ब वर धाड टाकली असता यात शैक्षणिक संस्था,राजकीय नेत्यांच्या नामांकित व्यक्तींच्या मुलां विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रकरणी मिळालेली माहिती अशी की, हॉटेल सुखसागर एक्झिक्युटिव्ह, रेस्टॉरंट । लॉजींग मध्ये मोठा पत्याचा कल्ब चालु असल्याची माहिती माजलगाव शहर पोलीसांना मिळाल्या नंतर १९जुलै शनिवार रोजीच्या रात्री ८:३०वा छापा टाकला तेंव्हा तेथील रूम नं.२०१ मध्ये जुगारी नामे स्वप्निल अमरनाथ खुर्पे, विश्वजीत प्रताप रांजवण,पृथ्वीराज रघुनाथ शेजुळ, श्रीधर अशोक रांजवण, सिद्धेश्वर जाधव, मनोज विठ्ठल सोळंके हे शहरातील नामांकित व्यक्तींचे मुले तीरट खेळताना रंगेहाथ पकडले. तर समजलेल्या माहिती वरुन नमुद रुममध्ये जुगार खेळण्यासाठी दररोज जुगार शौकीन लोक येतात आणि त्यात काही राजकीय व्यक्ती असतात मात्र रुम बुक करताना एकाच व्यक्तीचे आधार कार्ड घेऊन ती रुम देण्यात येते अशी माहिती व्यवस्थापक सुरेश पुजारी यांनी देऊन जबाबदारी झटकली आहे. म्हणुन सुखसागर एक्झिक्युटिव्ह रेस्टॉरंट । लॉजींग च्या मालका विरोधात कठोर



कारवाई करावी अशी मागणी शहरातील सामान्य नागरिकांनी केली असुन शहरातील काही लॉजींग, हॉटेल मध्ये अवैध धंदे सुरू असल्याचे सांगितले जात आहे त्याची माहिती कदाचित पोलीसांना असेल त्यावरही कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी केली आहे.दरम्यान सुख सागर मध्ये पकडलेल्या तरुणां विरोधात पोलीसांनी गुन्हे दाखल केले आहेत पण यात मोठी आर्थिक उलाढाल झाल्याची चर्चा माजलगाव शहरात ऐकावयास मिळत आहे.




This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com